N.A.A.C. Accredited - 2015
"B" Grade (CGPA 2.62)

## -: परिपत्रक :-

विषय:- विविध विद्याशाखा / विभागांतर्गत विविध विषयातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत...
संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र.३८१५, दि.२२/०७/२०१५.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व संकुलातील विभाग प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक विभागामध्ये चालविण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेश देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने आपणाला यापूर्वीच संदर्भिय पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी आपणास पुनःश्च कळविण्यात येते की,

शासनाने दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पुढीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेशासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | | आरक्षणानुसार टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | S.C | १३% |
| २. | अनुसूचित जमाती | S.T | ७% |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJ-A | ३% |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २% |
| ७. | इतर मागास वर्ग | OBC | १९% |
| ८. | सर्वसाधारण (खुला) | OPEN | ५०% |

शासन निर्णयानुसार विविध विषयाच्या अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ५०% व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५०% जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.मीईसी १०००/(१२३/२०००) तांशि - १ दि.१७/०४/२००० नुसार पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात, तसेच अपंगासाठी ३% टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

प्रवेशासाठी आवश्यक पात्रता पुढीलप्रमाणे:-

१. विशेष मागास प्रवर्ग व इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेशाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(१०८६)/तांशि-१ दि.२१ जुलै ,१९९७ नुसार दिलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांना ज्या ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होते. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

(कु.स.च)

18/10/18